## दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात

## नियमित दिवाणी दावा क्र. २३६/२०१५

## निशाणी ६८ लगत आदेश

## (सोपान विरुध्द नाना )

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. २ यांचे विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, दाव्याचे काम चालू असताना प्रतिवादी क्र. २ सजाबाई नाना माने या दि. १२.०४.२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. वादी हे आजारी असल्याने त्यासंना वेळेत वारस अभिलेखावर आणता आले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ विरुध्द दावा अबेट झाला आहे. सदर आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तरी प्रतिवादी क्र. २ यांचे विरुध्द दावा अबेटचा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जावरती प्रतिवादीतर्फे म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादीचे कथन की, प्रतिवादी क्र. २ मयत होवून २ वर्ष ५ महिने झाले आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अभिलेख तपासून पाहिले असता वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. ०२ या दि. १२.०४.२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. वादीने नि. ६९ कडे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे त्यांचे वारस या दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक आहे. सदर प्रतिवादी यांचे विरुध्द दावा अबेटमेंटचा आदेश पारित झालेला आहे. प्रस्तुतचा दावा वादीने सरस निरस मानाने वाटप होवून

मिळणेसाठी केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिवादी क्र. २ यांचेविरुध्द पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. जर वादीस मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित राहू शकतात. त्याहीपेक्षा तुर्तास दावा अत्यंत प्राथमिक स्वरुपात आहे. अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढून आणखी जटील बनू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता वादीवर खर्च लादून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (नि. ६८) वादीने रक्कम रु. २००/-(रु. दोनशे मात्र) दंड प्रतिवादींना देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र. ०२ यांचे विरुध्द झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

सांगोला (श्री. संजय मो. घुगे)
दिनांक – १२/०३/२०२४. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.